**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४०/२०१९** **दिनांक १७/०५/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ११/०५/२०१९ ते १७/०५/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून २२/०५/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०५ | १२/०५ | १३/०५ | १४/०५ | १५/०५ | १६/०५ | १७/०५ | | १८/०५ | १९/०५ | २०/०५ | २१/०५ | २२/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.२ | ३०.० | ३०.४ | ३०..० | ३०.० | ३१.४ | ३३.४ | **कमाल तापमान (अं.से)** | ३७ | ३८ | ३९ | ३९ | ३९ |
| २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.६ | २४.२ | २४.६ | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २६ | २५ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | ० | ० | ० |
| ७७ | ८४ | ८० | ७८ | ८० | ७१ | ७५ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७४ | ६२ | ६४ | ६४ | ६८ |
| ७३ | ७८ | ७३ | ६६ | ७० | ७३ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३२ | २२ | २४ | २५ | २५ |
| ४.८ | ३.५ | ३.३ | ३.३ | १०.६ | १०.० | १४.३ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ५ | ५ | ४ | ५ |
| द. | आ.पू. | ई.पू. | प. | प. | पू. | नै. | **वाऱ्याची दिशा** | नै. | आ.द. | पू. | द. | प. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १८ ते २२ मे, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. दिनांक १८ ते २२ मे, २०१९ पर्यंत आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **पक्वता** | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी 'वैभव" विळ्याने जमिनीलगत कापणी करून मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| **खरीप भात** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • भात रोपवाटीकेसाठी गादी वाफे तयार करावेत. प्रथम जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती चौरस मीटर १ किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. |
| **आंबा** | **फलधारणा अवस्था** | • काढणी योग्य फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• पावसाच्या सुरुवातीला आंबा झाडांना खोडकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. ही कीड झाडाची साल पोखरून आतील गाभा खाते. खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी १५ एम. एम. पटाशीच्या सहाय्याने प्रादुर्भित साल कडून झाडातील खोड किडीला बाहेर काढून मारून टाकावे. नंतर हा भाग क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५ मि. ली. प्रती १ लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग द्रावणाने चांगला भिजवावा किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही १० मि. ली. + ५० मि.ली. रॉकेल खोडकीडीच्या छिद्रामध्ये ओतावे. |
| **नारळ** | - | • तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | - | • तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, नवीन लागवड केलेल्या चिकू कलमांना ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | **रोपवाटीका** | • खरीप हंगामासाठी वांगी, मिरची आणि टोमेटो भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून पाण्याची उपलब्धता असल्यास भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी.<br>• तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या होणारी घट यामुळे, फळबाग रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• जनावरांना फऱ्या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्वजनावरांना लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**